खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : २७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१० सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर आता शासकीय अधिकारी प्रशासक

अक्षराज : सुनील क्षिरसागर

दि.०९, विंचूर (नाशिक) : राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली असूनही प्रशासकीय कारणास्तव निवडणुका घेता आलेल्या नाहीत, अशा ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत चालवण्यासाठी आता शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम १८२ चे पोटकलम (१) आणि कलम १५१ मधील तरतुदींनुसार, ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे सर्व अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (उएज) त्यांच्या अधिकारक्षेत्रात प्रत्यायोजित करण्यात आले आहेत.

या अधिकाऱ्यांकडे सोपवणार सूत्रे

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या अधिकारक्षेत्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर खालीलपैकी शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करू शकतील :-

**विस्तार अधिकारी (कृषी)**
**विस्तार अधिकारी (आरोग्य)**
**विस्तार अधिकारी (शिक्षण)**
**विस्तार अधिकारी (पंचायत)**
**किंवा अन्य कोणताही वर्ग-३ / वर्ग-२ दर्जाचा शासकीय अधिकारी**

**सहा महिन्यांची मुदत मर्यादा :**

प्रशासकाचा हा कार्यकाळ राजपत्रातील अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून कमाल ६ महिने किंवा ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पार पडून नवी कार्यकारिणी स्थापन होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत) वैध राहणार आहे.

शासनाने यापूर्वी निर्गमित केलेले सर्व जुने आदेश व अधिसूचना अधिक्रमित (रद्द) केल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे प्रलंबित निवडणुकांमुळे स्थानिक विकासाची कामे खोळंबू नयेत म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तातडीने प्रशासकांची नियुक्ती करण्याचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.

## गणेशोत्सवात मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी!



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, ठाणे :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात ये-जा करणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुरळीत व्हावा आणि मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील वाहतूक कोंडी टाळता यावी, यासाठी राज्य शासनाने १६ टन किंवा त्यापेक्षा अधिक वजनक्षमता असलेल्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर गणेशोत्सवाच्या महत्त्वाच्या कालावधीत निर्बंध घातले आहेत. परिवहन विभागाने यासंदर्भात आदेश जारी केला आहे.

गणेशोत्सवात कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. एसटी महामंडळाच्या जादा बसेस तसेच खासगी वाहनांची वर्दळ वाढल्याने महामार्गावर वाहतुकीचा ताण निर्माण होतो. त्यात अवजड वाहने, ट्रेलर्स तसेच रेती-वाळू वाहतूक करणारी वाहने वाढल्यास कोंडी होण्याची शक्यता असते. त्यामुळे मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

**अवजड वाहनांवरील निर्बंधाचा कालावधी**

११ ते १५ सप्टेंबर : मूर्ती आगमन व पूर्वतयारीच्या प्रवासासाठी ११ सप्टेंबर रोजी मध्यरात्री ००:०१ वाजेपासून १५ सप्टेंबर रोजी रात्री २३:०० वाजेपर्यंत निर्बंध राहतील.

१८ सप्टेंबर : पाच दिवसांच्या गणपती विसर्जनानंतरच्या परतीच्या प्रवासासाठी सकाळी ०८:०० ते रात्री २३:०० वाजेपर्यंत वाहतूक बंदी असेल.

१९ व २० सप्टेंबर : गौरी-गणपती विसर्जनानंतरच्या परतीच्या प्रवासासाठी १९ सप्टेंबर रोजी सकाळी ०८:०० ते रात्री २३:०० आणि २० सप्टेंबर रोजी रात्री २३:०० वाजेपर्यंत निर्बंध लागू राहतील.

२५ ते २६ सप्टेंबर : अनंत चतुर्दशीच्या विसर्जनासाठी २५ सप्टेंबर रोजी सकाळी ०८:०० वाजेपासून २६ सप्टेंबर रोजी रात्री २०:०० वाजेपर्यंत अवजड वाहनांना बंदी असेल.

## ३ दिवस लोटले, इंजिनीअर दमले; पण हनुमानाची मूर्ती १ इंचही हलेना
## चमत्कारिक घटनेमागचं गूढ उकललं !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, भोपाळ :** मध्य प्रदेशच्या उज्जैनमधील सती गेट परिसरातील खडे हनुमान मंदिरात असलेली मूर्ती हटवण्याचे प्रयत्न १० दिवसांपासून सुरू आहेत. पण अद्याप तरी या प्रयत्नांना यश आलेलं नाही. प्रशासनानं, अभियंत्यांच्या पथकानं रस्त्याच्या चौपदरीकरणात अडथळा ठरणारं हनुमानाचं मंदिर तोडलं. पण हनुमानाची मूर्ती एक इंचदेखील हलली नाही. मूर्ती हलवण्यासाठी क्रेन आणण्यात आल्या होत्या. पण मूर्ती काही केल्या आपल्या जागेपासून सरकत नाही. त्यामुळे अभियंते, तंत्रज्ञान अपयशी ठरत असल्याचं चित्र दिसू लागलं आहे.

हनुमानाची मूर्ती निश्चल असलेली पाहून परिसरात उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. हनुमंताला अन्यत्र जाण्याची इच्छा नसेल. त्यामुळेच मूर्ती हलत नसेल, अशी चर्चा भाविकांमध्ये जोर धरू लागली आहे. अभियंते, क्रेन अपयशी ठरल्यावर खखढ इंदूरच्या





पथकाला मूर्तीची खोली आणि आसपासच्या जमिनीची तपासणी करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. या पथकानं त्यांचा अहवाल दिल्यावर मूर्ती हटवण्याबद्दल रुपरेखा आखण्यात येईल.

इंटरलॉक तंत्रज्ञान म्हणजे काय?

खडे हनुमानाला डॉक्टर हनुमानदेखील म्हटलं जातं. लहान मुलं आणि आजारी माणसांच्या अडचणी खडे हनुमानजी दूर करतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. विक्रम विद्यापीठाचे पुरातत्त्व तज्ज्ञांनी हनुमानाची मूर्ती एक इंचदेखील न हलण्यामागचं कारण सांगितलं. 'जुन्या काळात मोठ्या मूर्ती इंटरलॉक तंत्रज्ञानानं उभारल्या जायच्या. खडे हनुमानाची मूर्तीदेखील याच पद्धतीनं उभारण्यात आली असावी. ही मूर्ती माळवा प्रांतात सापडणाऱ्या मजबूत बेसॉल्ट दगडानं तयार करण्यात आलेली आहे. परमार वंश आणि राजा भोज यांच्या कालखंडात अशा प्रकारच्या कलाकृती तयार केल्या जायच्या. त्यामुळेच खडे हनुमानाची मूर्ती एक इंचदेखील हलत नाही,' असं विक्रम विद्यापीठाचे पुरातत्त्व तज्ज्ञ प्राध्यापक डॉ. रमण सोळंकी यांनी सांगितलं.

इंटरलॉक तंत्रज्ञान प्राचीन भारतीय वास्तुकला आणि अभियांत्रिकीचा एक उत्तम नमुना आहे. या तंत्रज्ञानात दगड किंवा मूर्तींना एकमेकांसोबत 'खाच्यां'च्या आधारे जोडलं जायचं. त्यामुळे चुना, सिमेंट नसतानाही मोठमोठ्या वास्तू आणि जड मूर्ती शतकानुशतकं उभं राहायच्या. तामिळनाडूच्या तंजावरमधील बृहदेश्वर मंदिरदेखील इंटरलॉक पद्धतीनं उभारण्यात आलं आहे. चोळ साम्राज्याचे राजा राजराजा (पहिले) यांनी ११ व्या शतकात या भव्य मंदिराची उभारणी केली. त्यासाठी १,३०,००० टन ग्रेनाईट दगडांचा वापर करण्यात आला. हे मंदिर आजही मोठ्या दिमाखात उभं आहे.

## राज्यातील सर्वात मोठे पुरातन शिवलिंगाला मिळाले भव्य मंदिररूपी छत्र

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या पुरातन महाशिवलिंगाच्या भव्य जीर्णोद्धार निमित्त आयोजित धार्मिक सोहळा मंगळवारी उत्साहात पार पडला. अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या धार्मिक सोहळ्याने या ऐतिहासिक शिवस्थानाच्या वैभवात आणखी भर पडली. आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आणि स्वखर्चातून साकारलेल्या मंदिरामुळे तब्बल ४०० हून अधिक वर्षे उघड्यावर असलेल्या महादेवाला आता भव्य मंदिररूपी छत्र मिळाले आहे.

यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, वेकोली व्यवस्थापक संजीवसिंग रेड्डी, मंदिर समिती अध्यक्ष शंकर बल्लेपवार, सचिव किशोर रायपूरकर, चंद्रपूर महानगर जिल्हा प्रभारी अर्चना डेहनकर, मनपा महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव, स्थायी समिती सभापती मनस्वी गिर्हे, मनपा गटनेता चंद्रशेखर शेट्टी, नगराध्यक्ष नीलेश ताजने, जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रदेश कार्यकारिणी सदस्य तुषार सोम, उपाध्यक्ष बलराम डोडानी, महामंत्री रवींद्र गुरनुले, सविता दंढारे, मनोज पाल, नामदेव डाहुले, श्याम कनकम, विधानसभा प्रमुख दशरथसिंह ठाकूर, महिला मोर्चा प्रभारी वंदना हातगावकर, वेदांती करन देवतळे,गटनेता मीना मोरपाका, महिला शहर अध्यक्षा सूचित लुटे, नगरसेवक लखनसिंग चंदेल, संजय कंचर्लावार, जितेश कुळमेथे, नितेश गवळे, रॉबिन बिश्वास, भालचंद्र दानव, आशिष मासिरकर, निरीक्षण तांड्रा, नगरसेविका सविता कांबळे, शीतल गुरनुले, पुष्पा उराडे, राजलक्ष्मी कारंगल, सरला कुळसंगे, अनुजा तायडे, आशा देशमुख, ज्योती जीवने, डीलन केळझरकर, करिष्मा जंगम, अनिता चौके, मंडळ अध्यक्ष विनोद खेवले, प्रदीप किरमे,



रवी जोगी, सारिका संदूरकर, सुभाष आदमने, घुग्घुस शहर अध्यक्ष संजय तिवारी, यांची उपस्थिती होती.

निसर्गाच्या सानिध्यात वसलेले हे पुरातन महाशिवलिंग चंद्रपूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाची जिवंत साक्ष मानले जाते. मात्र अनेक वर्षे हे शिवलिंग ऊन, वारा आणि पावसाचा सामना करत उघड्यावर होते. या प्राचीन शिवस्थानाचे महत्त्व लक्षात घेऊन आ. किशोर जोरगेवार यांनी मागील श्रावणात मंदिराच्या जीर्णोद्धाराचा संकल्प केला. मागील श्रावणातील संकल्प याच श्रावणात पूर्णत्वास नेत केवळ मंदिराची उभारणीच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यात आला.

हिमाचल प्रदेश आणि नेपाळच्या पारंपरिक स्थापत्यशैलीचा प्रभाव असलेल्या भव्य मंदिराला आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप देण्यात आले आहे. त्यामुळे पुरातन महाशिवलिंगाभोवती उभे राहिलेले हे नवे मंदिर श्रद्धा, स्थापत्य आणि पर्यटनाचा अनोखा संगम ठरत आहे. जीर्णोद्धारानंतर प्रथमच मोठ्या भक्तिभावाने धार्मिक विधी पार पडल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला.

या सोहळ्यास अमृता फडणवीस यांची विशेष उपस्थिती लाभली. त्या कावड घेऊन मंदिर परिसरात दाखल झाल्या. त्यांच्या उपस्थितीत शिवलिंग पूजन, मंत्रोच्चारात महाअभिषेक, महाआरती आणि महाकाल शृंगार दर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्तांनी उपस्थित राहून महादेवाचे दर्शन घेतले. आ. किशोर जोरगेवार यांच्या विनंतीनंतर अमृता फडणवीस यांनी 'शिवतांडव स्तोत्र' सादर केले. त्यांच्या या सादरीकरणाने उपस्थित भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, आज आपण ज्या भूमीवर उभे आहोत, त्या भूमीला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. जवळपास ४०० वर्षे जुने हे शिवलिंग वर्षानुवर्षे उघड्यावर होते. ही परिस्थिती आपल्या श्रद्धेला शोभणारी नव्हती. मागील वर्षी अमृता फडणवीस चंद्रपुरात आल्या होत्या. त्यांनी हे शिवलिंग पाहिले आणि 'भोलेनाथ असे उघड्यावर असणे योग्य नाही; येथे भव्य मंदिर झाले पाहिजे, असे सांगितले. त्यांचे हे शब्द आमच्यासाठी संकल्पाचे शब्द ठरले.

अमृता फडणवीस यांनीही या मंदिराच्या उभारणीचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, मागील वर्षी मी येथे आले होते आणि पुन्हा यंदाही येथे येण्याचा योग आला. मंदिराचे काम थांबविण्याचे प्रयत्न झाले; मात्र शक्तीपेक्षा श्रद्धा मोठी असते. त्यामुळे हे मंदिर येथे उभे राहिले. शिवतांडव म्हणजेच बदल आणि परिवर्तन. आज कावड घेऊन येथे येण्याचा मला विशेष आनंद झाला. येथे उपस्थित प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्तीचा भाव दिसत आहे. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाज एकत्र येतो. एखादे काम श्रद्धा आणि सातत्याने केले, तर विषाचेही अमृत होते. असे ते म्हणाल्या.

## आदेश झाले, तरी रस्ता खड्ड्यातच; अखेर ग्रामस्थांचा 'रास्ता रोको'

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, डहाणू (पालघर) :** रस्ता दुरुस्तीचे आदेश होऊनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने संतप्त झालेल्या चरी पावन, दह्याळे, कांदरवाडी परिसरातील हजारो ग्रामस्थांनी अखेर रस्त्यावर उतरून 'रास्ता रोको' आंदोलन केले. सामाजिक कार्यकर्ते ॲड. विराज गडग यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिला व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत प्रशासनाच्या दिरंगाईचा निषेध केला.

चरी पावन ते दह्याळे-कांदरवाडी या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, वाहनचालक, पादचारी, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

**१५ दिवसांपूर्वी निवेदन; तरीही कार्यवाही नाही**

रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांनी सुमारे १५ दिवसांपूर्वी प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन तातडीने रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली होती. त्यानंतर पालघर विश्रामगृह येथे प्रशासकीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत रस्त्यावरील खड्डे बुजवून आवश्यक दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

खासदार डॉ. हेमंत सावरा आणि आमदार राजेंद्र गावित यांनीही प्रशासनाला खड्डे बुजविण्याचे आदेश दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, आदेश होऊनही प्रत्यक्षात काम सुरू न झाल्याने ग्रामस्थांचा संताप वाढत गेला. अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रास्ता रोको आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला.

**'चांगला रस्ता, आमचा हक्क!'**

आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी 'खराब रस्ते, आमची समस्या आता पुरे!', 'चांगला रस्ता-आमचा हक्क!' अशा घोषणा देत प्रशासनाचा निषेध केला. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**बांधकाम विभागाचे अभियंता आंदोलनस्थळी**

आंदोलनाची दखल घेत जिल्हा प्रशासनाच्या वतीने डहाणू बांधकाम विभागाचे अभियंता आंदोलनस्थळी दाखल झाले. आंदोलकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांच्याकडे सुपूर्द केले. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून हा मार्ग खड्डेमुक्त करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली.

**'दखल घेतली नाही तर जिल्ह्यात आंदोलन'**

यावेळी ॲड. विराज गडग यांनी प्रशासनाला इशारा दिला. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधींना यापूर्वीच निवेदन देण्यात आले आहे. प्रशासकीय बैठकीत दुरुस्तीच्या सूचना देऊनही प्रत्यक्ष काम झाले नाही. यापुढेही प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नाही, तर जिल्ह्याच्या ठिकाणी तीव्र निषेध आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

**आंदोलनानंतर खड्डे बुजविण्यास सुरुवात**

दरम्यान, आंदोलनाची दखल घेत दह्याळे ग्रामपंचायत तसेच शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे आणि तालुका प्रमुख संतोष देशमुख यांनी तत्परता दाखवत रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी खडी-माती टाकण्यास सुरुवात केली. आंदोलनानंतर तातडीने मटेरियल टाकून खड्डे बुजविण्याचे काम सुरू केल्याबद्दल ॲड. विराज गडग यांनी ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत व संबंधितांचे आभार मानले.

**तात्पुरती डागडुजी नको; कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी**

रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये खडी-माती टाकून तात्पुरती डागडुजी करण्याऐवजी मार्गाची कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक, विद्यार्थी व वाहनचालक या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे रस्त्याची तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. आंदोलनावेळी ॲड. विराज गडग, दह्याळेचे सरपंच सुनील भोईर, माजी उपसरपंच कमल माळी, रुपेश धिंडे, राजू दळवी, जगन खरपडे, कैलास सुतार, कृष्णा कोंब, चिंतामण पाटारा, रुपेश तल्हा, महेंद्र कोंब यांच्यासह परिसरातील हजारो नागरिक व महिला उपस्थित होत्या.




## दणदणाट थांबवा, दुष्काळाच्या हाका ऐका

डीजे वा ध्वनिक्षेपकांच्या आवाजाचे डेसिबल हल्ली वाढले आहेत. त्यात समर्थन-विरोधाच्या नारेबाजीची भर पडल्याने हा आवाज अधिकच कर्णकर्कश झाला. किंबहुना, तो तसाच बनावा, गोंगाट वाढावा, याचीच जणू खबरदारी घेतली जात आहे. या दणदणाटामुळे लोकांचे आरोग्य बिघडते आहेच; पण राज्याचे आरोग्य आणि सामाजिक स्वास्थ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाने ओढ दिल्याने पाणीटंचाई आणि संभाव्य दुष्काळ यांसारखे गंभीर प्रश्न या गदारोळात दाबले गेले आहेत. मूळ समस्या मागे पडत आहेत. त्यांच्या सोडवणुकीला प्राथमिकता मिळायला हवी; सणावारातील जल्लोषाला नव्हे.

यंदा मान्सून अंमळ उशिरा दाखल झाला. जुलैमध्ये त्याने काहीसा दिलासा दिला, काही धरणेही तुडुंब भरली; परंतु ऑगस्टमधील खंडाने शेतशिवारापुढे गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. अनेक वर्षांत राज्य प्रथमच श्रावणसरींना पारखे झाले. पाऊस लांबला किंवा त्याची तूट राहिली, तरी सह्याद्री आणि त्याच्या डोंगररांगा या काळात हिरवाईने नटलेल्या दिसतात. यंदा मात्र १ जून ते ५ सप्टेंबरदरम्यान पावसाची १७ टक्के तूट नोंदवली गेली. शेतातील उभी पिकेच नव्हे, तर डोंगरांवरील हिरवाईही कोमेजली. ती जणू 'आम्हाला वाचवा' अशी साद घालत आहे; पण दणदणाटाने बहिरी झालेली व्यवस्था ती ऐकण्याच्या स्थितीत दिसत नाही. जुलैतील चांगल्या पावसामुळे राज्यातील तीन हजारांहून अधिक धरणांतील पाणीसाठ्याचे वरवरचे चित्र समाधानकारक वाटते. मात्र, विभागनिहाय तफावत हा काळजीचा मुद्दा. कोकणातील धरणांत नव्वद टक्क्यांहून अधिक साठा दिसतो; पण मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत तो दहा-बारा टक्क्यांवर असणे, हा टोकाचा विरोधाभास. म्हणजे धरणे पूर्णपणे रिकामी नसली, तरी पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. या तफावतीकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यातील चित्र विदारक असेल.

मराठवाड्यातील आठही जिल्हे पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. या विभागात पेरणीक्षेत्र पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा सुमारे सात टक्क्यांनी घटले आहे. पावसाची तूट वीस टक्क्यांहून अधिक असून, परभणी आणि लातूरमध्ये ती सर्वाधिक तीव्र आहे. कापूसक्षेत्रात कमालीची घट झाली, ऊसक्षेत्र मोठ्या प्रमाणात कमी झाले आणि शेतकऱ्यांनी सोयाबीनकडे वळण्याचा प्रयत्न केला; परंतु आता सोयाबीन पावसाअभावी माना टाकू लागल्याने हा विभाग संकटाचा केंद्रबिंदू आहेच; पण विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातही पाऊसपाणी व पिकांची अवस्था संमिश्र असल्याने चिंता वाढते आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, भाजीपाला, डाळिंब, कांदा अशी पिके करपू लागली आहेत. पिकांना बाटलीने पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असेल, तर नजीकच्या संकटाचा अंदाज यावा. सप्टेंबर कोरडा गेला, तर संपूर्ण खरीपच अडचणीत येऊ शकतो. ऐंशी-नव्वद टक्के पेरणी झाली म्हणजे हंगाम वाचला, असे म्हणता येत नाही. खरी कसोटी पिके जगविण्याची आणि त्यांची उत्पादनक्षमता टिकविण्याची आहे. येत्या काळात विहिरी, बोअरवेल आणि लहान-मोठ्या तलावांवरील ताण वाढत जाईल.

शेती, उद्योग, शहरे या तिन्ही घटकांना मोठ्या प्रमाणात पाणी लागते आणि ते मिळाले नाही तर विकासाचा वाटाच बंद होऊ लागतात. यापैकी कोणतेही एक क्षेत्र होरपळल्यास नुकसान ठरलेले. परंतु, संकट आस्मानी असो की सुल्तानी, शेतीला फटका बसल्यास त्याचे दूरगामी परिणाम जाणवतात. बाजारपेठ, वाहतूक, सहकारी संस्था, दूध व्यवसाय आणि रोजगार यांवर त्याचे सावट पडते. ग्रामीण अर्थसाखळी विस्कळित होते. तूर्तास महाराष्ट्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा आहे, असे म्हणता येईल; परंतु दुष्काळाची चाहूल संकटात परिवर्तित होऊ नये, ही सरकार आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. दुष्काळ केवळ पावसाच्या टक्केवारीने ठरत नाही. पाऊस कधी पडला, किती दिवसांचा खंड पडला, पिकांना कोणत्या अवस्थेत पाणी मिळाले, भूजल किती शिल्लक आहे आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत खरोखरच टिकाऊ आहेत का, यावर खरी परिस्थिती अवलंबून असते. म्हणूनच तालुकानिहाय आढावा, पिकांचे पंचनामे, टँकर नियोजन, चारा उपलब्धता आणि पीकविमा दाव्यांची पूर्वतयारी आवश्यक आहे. दुर्दैवाने यात आपण कमी पडतो. कोरड्या आभाळाची छाया अधिक गडद होत असताना केवळ घोषणा पुरेशा नाहीत. आजची टंचाई उद्याच्या दुष्काळात रूपांतरित होऊ द्यायची नसेल, तर प्रशासनाने तातडीने कामाला लागले पाहिजे. शेवटी हा केवळ कमी पावसाचा प्रश्न नाही; तो जलसुरक्षा, अन्नसुरक्षा आणि एकुणात अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याचा विषय आहे. गोंगाट थांबवून हा आवाज ऐकला नाही, तर महाराष्ट्राला त्याची मोठी किंमत चुकवावी लागेल.

**– संपत थेटे**

# दुष्काळाचे सावट !



ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. जून आणि जुलै महिन्यांपासूनच पावसाने ओढ दिल्याने ऑगस्टमध्ये तरी परिस्थिती सुधारेल, अशी आशा होती. मात्र ऑगस्ट महिन्यातही अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे राज्यातील शेतीचे आणि पाणी साठ्याचे गणित बिघडले असून, दुष्काळाचे सावट हळूहळू अधिक गडद होताना दिसत आहे.

मान्सूनपूर्व पावसानेही शेतकऱ्यांची निराशा केली. पावसाळ्याच्या सुरुवातीला पुरेसा पाऊस न झाल्याने अनेक भागांत पेरण्यांना विलंब झाला. शेतकऱ्यांनी आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहिली आणि परिस्थितीचा अंदाज घेत पेरणीचे नियोजन केले. मात्र पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले. आधीच महागाईच्या काळात बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च झालेला असताना पुन्हा पेरणी करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण आहे.

मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत पावसाची स्थिती चिंताजनक आहे. मराठवाड्यात पावसाची अनिश्चितता ही काही नवीन बाब नाही. मात्र यंदा सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. पुरेसा पाऊस न झाल्यामुळे कपाशी, सोयाबीन, धान, कडधान्ये यांसारखी प्रमुख पिके संकटात सापडली आहेत. पिके पाण्याअभावी कोमेजू लागल्याने बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

पावसाचा प्रश्न केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नाही. शेतीचे उत्पादन घटले तर त्याचा थेट परिणाम बाजारपेठेवर होतो. अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर कृषी उत्पादनांचा पुरवठा कमी झाला तर त्यांच्या किमती वाढण्याची शक्यता असते. त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांना सहन करावा लागतो. महागाई वाढल्याने कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याची चिंता ही प्रत्यक्षात संपूर्ण समाजाची चिंता आहे.

पावसाअभावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. राज्यातील धरणांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झाला नाही तर आगामी उन्हाळ्यात अनेक गावांना आणि शहरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने आतापासूनच पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारणाच्या कामांना गती आणि पाण्याची गळती रोखणे याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल.

पावसाअभावी जनावरांच्या चारा-पाण्याचाही प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला मोठे महत्त्व आहे. चारा उपलब्ध न झाल्यास पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहू शकते. परिस्थिती गंभीर झाल्यास शासनाला चारा छावण्या आणि इतर मदतयोजना सुरू कराव्या लागू शकतात. त्यामुळे संभाव्य संकटाची तीव्रता वाढण्यापूर्वीच प्रशासनाने तयारी करणे गरजेचे आहे.

दुष्काळाचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. शेतीचे उत्पादन चांगले झाले तर शेतकऱ्यांच्या हातात पैसा येतो आणि ग्रामीण भागातील बाजारपेठेला चालना मिळते. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढली की विविध व्यवसायांना त्याचा फायदा होतो. याउलट शेतीचे नुकसान झाले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट येते. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा किंवा इतर मदत देण्यासाठी सरकारला मोठा आर्थिक भार उचलावा लागतो. त्यामुळे दुष्काळ हा केवळ कृषी क्षेत्राचा प्रश्न नसून तो संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे.

हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यात पावसाची स्थिती काही प्रमाणात सुधारण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी केवळ अंदाजावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही. पावसाची अनिश्चितता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा ठेवतानाच प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी शासन आणि प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे वेळेत पंचनामे करणे, पीकविमा आणि शासकीय मदत मिळवून देणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे आणि आवश्यक त्या भागात जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे याला प्राधान्य दिले पाहिजे. संकट आल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकटाची शक्यता लक्षात घेऊन आधीच तयारी करणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसमोर हवामान बदलामुळे नवनवीन आव्हाने निर्माण होत आहेत. त्यामुळे दीर्घकालीन जलव्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण आणि पीकपद्धतीत आवश्यक बदल याकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. दरवर्षी पावसाची वाट पाहत संकटाचा सामना करण्याऐवजी पाण्याचे शाश्वत नियोजन करणे ही काळाची गरज आहे.

बळीराजाची नजर अजूनही आकाशाकडे लागली आहे. उरलेल्या पावसाळ्यात दमदार पाऊस पडून पिकांना जीवदान मिळावे, धरणे भरावीत आणि राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, अशी प्रत्येकाचीच अपेक्षा आहे. मात्र पाऊस पडेल या आशेवर हातावर हात ठेवून बसण्याची वेळ आता टळली पाहिजे. संभाव्य दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे आतापासूनच युद्धपातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कारण दुष्काळाची झळ प्रथम शेतकऱ्याला बसते; पण त्याची तीव्रता वाढली तर त्याचे परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावे लागतात. म्हणूनच 'पाऊस येईल तेव्हा पाहू' या मानसिकतेऐवजी 'पाऊस कमी पडला तरी संकटाला सामोरे जाण्याची तयारी आजपासून करू', अशी भूमिका शासनाने आणि समाजाने घेणे आवश्यक आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# बोरी येथे पावसासाठी विशेष नमाज व सामूहिक दुआ

**अक्षराज : जफर शेख**

**दि.९, बोरी (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोरी वपपरिसरात पावसाने दांडी मारल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बुधवार, रोजी ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का अदा करण्यात आली.पयावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित राहून पावसासाठी सामूहिक नमाज तसेच दुआ करण्यात आली.यावेळी हाफिज मोबीन यांनी नमाज अदा केली ,तर मौलाना कलीमोद्दीन यांनी विशेष दुआ केली. परिसरात मुबलक पाऊस पडावा,



शेती-पिकांना दिलासा मिळावा, जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या दूर व्हावी, यासाठी उपस्थित सर्वांनी मनोभावे दुआ केली.यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी वर्ग चिंतेत आहे, जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी हिरवा चारा उपलब्ध नसल्याने पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची समस्याही दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्काचे आयोजन करण्यात आले. यावेळी मौलाना मकसूद यांनी नमाज-ए-इस्तिस्काचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या काळातही पावसाअभावी अशी परिस्थिती निर्माण झाल्यास ही नमाज अदा करून पावसासाठी दुआ केली जात असे. त्यामुळे सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीत सर्वांनी प्रार्थना करावी असे आवाहन त्यांनी केले.मौलाना उस्मान यांनी पुढे सांगितले की, नमाज-ए-इस्तिस्का सलग तीन दिवस अदा करण्यात येणार आहे. बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार या तीनही दिवशी होणाऱ्या नमाज-ए-इस्तिस्कामध्ये समाजातील सर्व बांधवानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि पावसासाठी मनोभावे दुआ करावी, असे आवाहन करण्यात आले परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, शेतीला दिलासा मिळावा, जनावरांसाठी मुबलक चारा उपलब्ध व्हावा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दूर व्हावा, यासाठी नमाज अदा करण्यात आली. यावेळी हाफेज इलाही, मौलाना उस्मान, मौलाना जैद, मौलाना फैसल, मौलाना मोईन, माजी उपसरपंच रफिक शेख यांच्यासह बोरी परिसरातील मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

आयोजनासाठी सदर पाशा शेख, नायब सदर सय्यद खिजर, शेख इरफान, अजीमोद्दीन अन्सारी, इरशाद शेख अली तसेच सर्व मर्कज कमिटी सदस्यांनी आवश्यक नियोजन करून सहकार्य केले. मैदानाची व्यवस्था, उपस्थितांसाठी आवश्यक सोयी आणि नमाज सुरळीतपणे पार पडण्यासाठी कमिटीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या अडचणींचा सामना करत आहेत. अल्लाहने रहमतचा पाऊस बरसवावा, शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि दुष्काळसदृश परिस्थिती दूर व्हावी, अशी भावना व्यक्त करत उपस्थितांनी सामूहिक दुआ केली.

## स्मारक भग्न

समाजकंटक कुणी
स्मारका करी भग्न
नाचाया थया थया
तत्परअसतात नग्न

शासनचालले छान
आयते आले विघ्न
ढोल ताशे वाजवा
चलरे मोडाया लग्न

कशाला उगा काम
होती सगळे उद्विग्न
डोळे मिटे प्रशासन
आपले मस्तीत मग्न

तपास बसावे करत
कोण कुणा संलग्न
आगीचे बंब येईतो
बेचिराख करी अग्न

अस्मितेला लागेचूड
परंपरे दिला भडाग्न
काळेकृत्य काळिमा
मूळ हेतूला चिताग्न

सत्ता धारी विरोधक
वाद विवादा विमग्न
संरक्षणा ऐशी तैशी
यंत्रणा बनते विनग्न

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# अमृता फडणवीस यांच्या हस्ते १०० विद्यार्थिनींना सायकल वाटप

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्राचीन शिवलिंगाच्या जीर्णोद्धार कार्यक्रमासाठी चंद्रपूर दौऱ्यावर आलेल्या अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १०० शाळकरी विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले. आ. किशोर जोरगेवार यांच्या वतीने गजानन निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनींचा प्रवास सुलभ व्हावा आणि आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने सायकल वाटपाचा हा उपक्रम राबविण्यात आला. अमृता फडणवीस यांच्या हस्ते सायकली मिळाल्यानंतर विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. यावेळी अमृता फडणवीस यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व सांगितले. मुलींनी शिक्षणाला प्राधान्य देत आत्मविश्वासाने पुढे जावे आणि आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करावा, असे आवाहन त्यांनी केले.




यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले, चंद्रपूरच्या मुलींमध्ये गुणवत्ता आणि क्षमता आहे. मात्र अनेक विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी प्रवासाच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास सुलभ व्हावा आणि शिक्षणाची वाट अधिक सोपी व्हावी, यासाठी सायकल वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. मुली शिकल्या तर कुटुंब आणि समाजाची प्रगती निश्चित होते. त्यामुळे चंद्रपूरमधील प्रत्येक मुलीला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू. असे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला कल्याणी किशोर जोरगेवार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थीनी व पालक उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, बुलढाणा येथे बुधवार, दिनांक ०९ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य प्रमोद कावरे, पर्यवेक्षक पी.नरवास, दिनेश पाटील, नितीन ढोमणे, पंढरीनाथ वाघ उपस्थित होते. शाळेतील माजी विद्यार्थी विनोद कैलास गोरे (संपादक, अक्षराज मीडिया) प्राजक्ता चव्हाण गोरे (सहसंपादिका, अक्षराज मीडिया) यांचा प्राचार्य प्रमोद कावरे यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. विनोद कैलास गोरे यांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन ढोमणे यांनी केली. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### रायगडच्या पालकमंत्री पदी निवड; भरतशेठ गोगावले यांचा क्षेत्र महाबळेश्वर ग्रामस्थांतर्फे भव्य सत्कार



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०९, महाबळेश्वर (सातारा) :** रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल भरतशेठ गोगावले यांचा क्षेत्र महाबळेश्वर येथील ग्रामस्थांच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात भव्य सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सयाजी लांगी, जीवन महाबळेश्वरकर, शांताराम धनावडे, संजय कांबळे, शुभम मोरे, दशरथ पवार, यशवंत रांजणे, किसन लांगी, शंभूराजे वाडेकर, मनीष झाडे, शुभांगी धनावडे, मोहन धनावडे, नारायण लांगी, मंगेश साळेकर, अनिल लांगी, गणेश धनावडे, संतोष धनावडे, प्रदीप कात्रट यांच्यासह क्षेत्र महाबळेश्वर परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री म्हणून भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून क्षेत्रमहाबळेश्वर च्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केला.

### चारठाण्यात बैलपोळ्याची बाजारपेठ सजली

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०९, चारठाणा :** शेतकऱ्याच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या बैलपोळा सणाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने चारठाणा येथील बाजारपेठेत पोळ्याची तयारी जोरात सुरू झाली आहे. बैलांना सजविण्यासाठी लागणारे झुली, गोंडे, घुंगरू, शिंगांचे रंग व विविध सजावटीचे साहित्य बाजारात दाखल झाले असून, खरेदीसाठी शेतकरी व नागरिकांची लगबग सुरू आहे. वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणून बैलपोळा साजरा केला जातो. या दिवशी बैलांना आंघोळ घालून सजविले जाते.

शिंगांना रंग देऊन झुली, गोंडे व घुंगरांनी त्यांची सजावट केली जाते. त्यामुळे पोळ्याच्या काही दिवस आधीपासूनच बाजारपेठेत सणाचा उत्साह दिसून येत आहे. मात्र, यंदा दुष्काळाच्या सावटामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. पिकांची चिंता, उत्पन्नाचा अभाव आणि वाढता शेती खर्च यामुळे पोळ्याचा सण साजरा करताना खर्चाचा ताळमेळ कसा साधायचा, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. बाजारपेठेत पोळ्याची लगबग सुरू असली तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आर्थिक संकटाची चिंता दिसून येत आहे. आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजविण्याची इच्छा प्रत्येक शेतकऱ्याची असली, तरी बैल सजवायचा की घरचा खर्च भागवायचा? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी, प्रवास होणार सुखकर

### गणेशोत्सवात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाची कडक पावले; जड वाहनांवर बंदी

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०९, पनवेल (नवी मुंबई) :** गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुरळीत आणि वाहतूक कोंडीमुक्त व्हावा यासाठी परिवहन विभागाने मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर १६ टन किंवा त्यापेक्षा अधिक वजनक्षमतेच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर विविध टप्प्यांत निर्बंध लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ट्रक, मल्टीॲक्सल वाहने, ट्रेलर, लॉरी आदी अवजड वाहनांना निश्चित कालावधीत महामार्गावर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ११ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून १५ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर १६ टन किंवा त्यापेक्षा अधिक वजनक्षमतेच्या सर्व जड-अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. या कालावधीत कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाच्या अनुषंगाने १८ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत अवजड वाहनांवर बंदी लागू राहील. तसेच १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत आणि २० सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत सात दिवसांच्या गणपती विसर्जन, गौरी-गणपती विसर्जन आणि भाविकांच्या परतीच्या प्रवासामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हे निर्बंध कायम राहतील. अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवरही विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहेत.




२५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून २६ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत मुंबई-गोवा महामार्गावर १६ टन किंवा त्यापेक्षा अधिक वजनक्षमतेच्या जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी राहणार आहे. या काळात मोठ्या प्रमाणावर गणेश विसर्जन मिरवणुका आणि भाविकांचा परतीचा प्रवास सुरू असल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. मात्र, अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे. जेएनपीटी आणि जयगड बंदरातून आयात-निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस, औषधे, लिक्विड मेडिकल ऑक्सिजन, अन्नधान्य, भाजीपाला तसेच इतर नाशवंत वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना निर्बंध लागू राहणार नाहीत. याशिवाय पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि इतर अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांनाही वगळण्यात आले आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रस्ता रुंदीकरण, दुरुस्ती आणि इतर विकासकामे सुरू राहण्यासाठी त्या कामांशी संबंधित वाहनांनाही विशेष परवानगी देण्यात आली आहे. महामार्गाच्या कामासाठी आवश्यक साहित्य व यंत्रसामग्रीची वाहतूक करणारी वाहने निर्धारित नियमांनुसार मार्गावरून जाऊ शकतील.

गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, नवी मुंबई, रायगड आणि संपूर्ण कोकण विभागात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. अशा परिस्थितीत अवजड वाहनांची अतिरिक्त वाहतूक झाल्यास वाहतूक कोंडी निर्माण होण्याबरोबरच अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे भाविकांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत करण्यासाठी परिवहन विभागाने हे निर्बंध लागू केले असून वाहनचालक आणि वाहतूकदारांनी या कालावधीची नोंद घेऊन आपल्या वाहतुकीचे नियोजन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूरच्या, पोलीस विभागासाठी ३० कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या पोलीस यंत्रणेला अधिक सक्षम करण्यासोबतच पोलीस अधिकारी व अंमलदारांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सातत्याने संवेदनशील भूमिका घेणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर पोलीस विभागासाठी आरक्षित जमिनीच्या भूसंपादनासाठी ३० कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेतील पोलीस विभागासाठी आरक्षित जागेचा उपयोग डॉग स्क्वॉड ट्रेनिंग सेंटर, पोलीस भरतीसाठी शारीरिक मैदान, प्रशिक्षण केंद्र, बी.डी.डी.एस. ट्रेनिंग सेंटर, इनडोअर फायरिंग बट, पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी शासकीय निवासस्थान तसेच विविध योजनांसाठी करण्यात येणार आहे. नवीन चंद्रपूर येथे होणाऱ्या या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने झालेली ही प्रशासकीय कार्यवाही चंद्रपूरच्या पोलीस प्रशासनाला अधिक सक्षम अधिष्ठान देणारी ठरणार आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेमध्ये मौजा कोसारा येथील आरक्षण क्र. ११० मधील ८.३० हेक्टर तसेच मौजा दाताळा येथील आरक्षण क्र. १३३ मधील १२.२५ हेक्टर जमीन पोलीस विभागाच्या आरक्षणाने बाधित जागा भूसंपादन करण्यात येणार आहे. या जमिनीवर पोलीस विभागासाठी विविध महत्त्वपूर्ण सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

पोलीस दल हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी चोवीस तास कार्यरत असते. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणापासून निवासापर्यंत आणि अत्याधुनिक कौशल्यविकासापासून आवश्यक कार्यसुविधांपर्यंत प्रत्येक बाबतीत सक्षम पायाभूत सुविधा असणे गरजेचे आहे. ही गरज लक्षात घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पोलीस विभागाच्या सुविधांकडे नेहमीच संवेदनशीलतेने



पाहिले आहे. पोलीस स्टेशन इमारती, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था आणि त्यांच्या घरकुलाचा प्रश्न यानंतर आता प्रशिक्षण आणि इतर अत्यावश्यक सुविधांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या दिशेने त्यांनी पुढाकार घेतला आहे.

नवीन चंद्रपूर विकास योजनेतील मौजा कोसारा येथील आरक्षण क्र. ११० मधील ८.३० हेक्टर आर आणि मौजा दाताळा येथील आरक्षण क्र. १३३ मधील १२.२५ हेक्टर आर पोलीस विभागाच्या आरक्षणाने बाधित जमीन भूसंपादन करण्यासाठी यापूर्वीच ४३ कोटी ६५ लाख ८३ हजार १६ रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यापैकी आता ३० कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे या विविध सुविधा उभारण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित शासन निर्णयानुसार या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. चंद्रपूरच्या पोलीस प्रशासनाला केवळ आधुनिक कार्यालयीन सुविधा नव्हे, तर प्रशिक्षण, तंत्रज्ञान, निवास आणि कार्यक्षमतेला पूरक सर्वसमावेशक पायाभूत सुविधा मिळाव्यात, या व्यापक दृष्टिकोनातून आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने ही महत्त्वपूर्ण कार्यवाही होत आहे. त्यामुळे भविष्यात चंद्रपूरच्या पोलीस यंत्रणेच्या क्षमतावृद्धीसोबतच अधिकारी व अंमलदारांच्या सुविधांमध्येही मोठी भर पडणार आहे.

# गणेशोत्सवात डिजे नियमभंग केल्यास कडक कारवाई

### तलासरीत पोलीस-प्रशासनाची गणेश मंडळांसोबत संयुक्त समन्वय बैठक

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, तलासरी (पालघर) :** आगामी गणेशोत्सव शांततेत, उत्साहपूर्ण व सुव्यवस्थित वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तलासरी पोलीस ठाणे, तालुका प्रशासन आणि गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त समन्वय बैठक दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी तहसीलदार कार्यालय, तलासरी येथे पार पडली. बैठकीत ृग व ध्वनीक्षेपकाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला.

बैठकीस डहाणू विभागाच्या SDPO निशा जाधव, तहसीलदार अमोल पाठक, गटविकास अधिकारी डॉ. वैभव सापळे, तलासरी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रवि गोरे यांच्यासह PWD, MSEB, NHAI व संबंधित महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. याशिवाय गणेशोत्सव समन्वय समितीचे पदाधिकारी, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, शांतता व मोहल्ला समितीचे सदस्य, महिला दक्षता समितीच्या सदस्या, पोलीस पाटील, प्रतिष्ठित नागरिक तसेच ृग व ध्वनीक्षेपक चालक-मालक उपस्थित होते. बैठकीला सुमारे २०० ते २५० गणेश मंडळांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

**मिरवणुकीचे मार्ग पूर्वनियोजित करण्याच्या सूचना**

गणेश आगमन व विसर्जन मिरवणुकीचे मार्ग पूर्वनियोजित करून त्याची माहिती प्रशासन व पोलिसांना देण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या. मिरवणुकीमुळे वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. गर्दी आणि वाहतूक नियंत्रणासाठी प्रत्येक मंडळाने आवश्यकतेनुसार स्वयंसेवक नियुक्त करून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे सांगण्यात आले.

**महिला, मुलींच्या सुरक्षेला प्राधान्य**

गणेशोत्सव काळात महिला व मुलींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. छेडछाड किंवा अन्य गैरप्रकार आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

**सोशल मीडियावरील अफवांवर लक्ष**

सोशल मीडियावर अफवा, आक्षेपार्ह मजकूर, फोटो अथवा व्हिडिओ प्रसारित करून जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करू नये, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करू नये, असेही पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले.

**मंडप व विद्युत व्यवस्थेची सुरक्षितता आवश्यक**

गणेश मंडप उभारताना आवश्यक परवानग्या घेणे, रस्ता किंवा पादचारी मार्गावर अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे, तसेच मंडपातील विद्युत रोषणाई, वायरिंग आणि जनरेटरची सुरक्षितता तपासणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन वाहन व रुग्णवाहिकेला सहज मार्ग मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**DJ वापरावर पोलिसांची करडी नजर**

बैठकीत dJ व ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत विशेष मार्गदर्शन करण्यात आले. ध्वनीप्रदूषणासंदर्भातील लागू कायदे, शासनाचे आदेश आणि न्यायालयीन निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. dJ संदर्भातील लागू बंदी व निर्बंधांची कडक अंमलबजावणी केली जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले. गणेश मंडळांनी शक्यतो पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहनही करण्यात आले.




तहसीलदार कार्यालय, गटविकास अधिकारी, नगरपंचायत, PWD, MSEB आणि महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. संबंधित विभागांशी निगडित समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात आले. SDPO निशा जाधव यांनी गणेशोत्सव शांततेत आणि सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन, स्थानिक प्रशासन, गणेश मंडळे आणि नागरिकांमध्ये समन्वय असणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. सर्व गणेश मंडळांनी प्रशासनास सहकार्य करून शांतता, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जबाबदारीने भूमिका बजावावी, असे आवाहन त्यांनी केले. तलासरी पोलीस ठाणे हद्दीत गणेशोत्सव शांततामय व आनंददायी वातावरणात पार पडावा यासाठी पोलिसांकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी तसेच गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक अजय गोरड यांनी केले. एकूणच, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या संयुक्त समन्वय बैठकीत प्रशासनाने नियमांचे पालन, सामाजिक सलोखा आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे स्पष्ट केले.

# तांत्रिक कामगार युनियनने रक्तदानातून जपली सामाजिक बांधिलकी

## मुख्य अभियंता डॉ.भूषण शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या ४९व्या वर्धापन दिनानिमित्त प्रकाशनगर येथील सद्भावना कामगार मनोरंजन क्लब क्रमांक २ येथे दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये १६० रक्तपिशव्याचे संकलन रक्तदात्यांच्या उस्फुर्त प्रतिसादामुळे शक्य झाले.

शिबिराचे उद्घाटन व दीपप्रज्वलन खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे माजी केंद्रीय उपाध्यक्ष बापू देशमुख होते.

यावेळी उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, सचिन डेगवेकर, अधीक्षक अभियंता विलास उके, आनंद सातभद्रे, शिरीष वितोंडे, कमलेश मुनेश्वर, वैद्यकीय अधिकारी डॉ मुकेश गजभिये, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सुरक्षितता अधिकारी नितीन मोहोड, केंद्रीय सरचिटणीस रविद्र बारई, माजी केंद्रीय उपाध्यक्ष गजानन सुपे, शैलेंद्र अर्जीतवार उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.भूषण शिंदे, मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा यांनी मार्गदर्शन करताना संघटनेचा सामाजिक कार्याची प्रशंसा करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शैलेंद्र अर्जितवार, माजी केंद्रीय उपाध्यक्ष यांनी संघटनेच्या कार्याविषयी माहिती दिली. रवींद्र बारई, केंद्रीय सरचिटणीस यांनी संघटनेचे उद्दिष्ट आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी संघटनेने आजपर्यंत दिलेला लढ्याविषयी मुद्देसूद माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष बापू देशमुख, माजी केंद्रीय उपाध्यक्ष यांनी संघटना स्थापन करण्यामागील कारणे, तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मुद्द्यांची योग्य मांडणी करून निकाली काढण्यात आलेल्या अडचणी मांडून विद्यमान संघटनेच्या कामाविषयी समाधान व्यक्त केले सोबतच नवीन पदाधिकारी यांनी संघटनेमध्ये कशा पद्धतीने कार्य करावे याविषयी अमूल्य मार्गदर्शन केले.

रक्तदान शिबिरामध्ये उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करतांना एका रक्तदात्यामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते असे सांगितले. जगामध्ये सर्व वस्तू ह्या निर्मिती करण्याचे कारखाने आहे. परंतु अजूनही रक्त निर्माण करण्याचा कारखाना तयार झालेले नाही. रक्त तयार करण्याची शक्ती फक्त मानवी शरिरातच आहे. रक्तदान हे केवळ सामाजिक कार्य नसून माणुसकी जपणारी सेवा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खापरखेडा येथील कार्यरत कामगार संघटनेचे प्रतिनिधी, कामगार आणि नागरिकांनी सामाजिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन समाजाप्रती आपली बांधिलकी जपावी असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले. युनियनच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमामध्ये वार्ताफलक अनावरण, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरातून सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद शितळे यांनी केले. प्रस्ताविक संजीवकुमार गर्जे यांनी मांडले तर आभार प्रदर्शन जितेश कुरसुंगे यांनी केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनच्या झोन शाखा पदाधिकारी आणि सभासद बंधु भगिनींनी अथक परिश्रम घेतले.

# मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ११ अभ्यासिका - उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वरदान



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सध्या एकूण ११ अभ्यासिका (Study Center/Library) कार्यरत आहेत. या अभ्यासिकांमुळे शहरातील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडत आहे. या अभ्यासिकांमध्ये दररोज असंख्य विद्यार्थी UPSC, MPSC, CA, MBBS, IIT-JEE, NEET, वकिली व इतर उच्च शिक्षणाच्या तयारीसाठी अभ्यास करत आहेत. शांत वातावरण, मोफत वाचनालय, आणि अभ्यासासाठी पोषक सुविधा यामुळे विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत आहे.

**यंदाचे यश – अभिमानास्पद बाब :**

याच अभ्यासिकांमध्ये अभ्यास करून यावर्षी अनेक विद्यार्थी MPSC परीक्षा उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र शासनात अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत. ही आपल्या संपूर्ण मिरा-भाईंदर शहरासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

**अभ्यासिकांचे महत्त्व का वाढते?**

१. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासाची जागा मिळते.

२. स्पर्धा परीक्षांचे वातावरण तयार होते.

३. शहरातील विद्यार्थी मोठ्या पदावर गेल्यास आपल्या शहराचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशात उज्ज्वल होते.

**माणुसकी फाउंडेशनची व जनतेची मागणी व इच्छा**

माणुसकी फाउंडेशन तर्फे आम्ही महापालिका प्रशासनाचे या उपक्रमासाठी आभार मानतो आणि मागणी करतो की –

१. या ११ अभ्यासिकांमध्ये आणखी आधुनिक सुविधा (AC, Wi-Fi, अद्ययावत पुस्तके) वाढवाव्यात.

२. प्रत्येक प्रभागात अजून नवीन अभ्यासिका सुरू कराव्यात.

३. शहरातील जास्तीत जास्त उच्च शिक्षित विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकांचा लाभ घ्यावा आणि आपल्या शहराचे नाव देशपातळीवर झळकवावे, हीच आमची इच्छा आहे.

**विद्यार्थ्यांना आवाहन :**

आपणही जवळच्या अभ्यासिकेत प्रवेश घ्या, अभ्यास करा आणि अधिकारी बना

# चला शाळेत जावूया अभियानांतर्गत राज्याचे शिक्षणमंत्री भुसे जिल्हा चनकापूर शाळेत

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची जिल्हा परिषद आदर्श उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा चनकापूर, ता सावनेर, जि नागपूर येथे बुधवार, दिनांक ०९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी भेट दिली. राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची जिल्हा परिषद आदर्श उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा चनकापूर,ता. सावनेर,जि. नागपूर येथे भेट देऊन शाळेतील विविध शैक्षणिक व भौतिक सुविधांची तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची सविस्तर माहिती जाणून घेतली.या भेटीदरम्यान शिक्षणमंत्र्यांनी शाळेतील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

शालेय पोषण आहार व्यवस्था

विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार, त्याची गुणवत्ता, स्वच्छता, पाककृती व आहार व्यवस्थापन याबाबत त्यांनी माहिती घेतली, यासोबतच मा शिक्षणमंत्र्यांनी स्वतः विद्यार्थ्यांसमवेत पोषण आहाराचा आस्वाद सुद्धा घेतला व एकंदरीत गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले.या भेटीदरम्यान शिक्षण मंत्री यांनी शाळेतील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षकांची प्रत्यक्ष बैठक घेवून शाळे संदर्भात सविस्तर माहिती घेतली. दफ्तरमुक्त शाळा, ऑलिम्पियाड परीक्षा, शिष्यवृत्ती, शिवसृष्टी, भारतातील पहिली AI-VR lab, Ideal लैब, Astrophysics लैब , सामूहिक कवायत इत्यादींची माहिती शिक्षकाकडून घेण्यात आली. VR लैब चा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि त्याचे भरभरून कौतुक केले. शाळेला लागणाऱ्या काही सुविधा बद्दल पण जाणून घेतले ज्यात शिक्षकांद्वारा काही वर्गखोल्या, सभागृह, सर्व विद्यार्थ्यांसाठी शूज आणि सॉक्स, कायमस्वरुपी लिपिक, परिचारक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची मागणी करण्यात आली. या सर्व मागण्या तातडीने पूर्तता करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. खिचडी स्वयंपाकी आणि मदतनीस यांचेशी सुद्धा संवाद साधून त्यांचे मानधन वाढण्यासंदर्भाने सुद्धा सकारात्मक प्रतिसाद दिला.

शिक्षणमंत्री यांनी शाळेतील विविध वर्गांना भेट देऊन वर्ग अध्यापनाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. शिक्षकांकडून राबविल्या जाणाऱ्या अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांचा सहभाग, प्रश्नोत्तरांची पद्धत, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न तसेच विद्यार्थ्यांची विषय समजून घेण्याची क्षमता याबाबत त्यांनी बारकाईने माहिती घेतली.यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी अतिशय आपुलकीने व मोकळेपणाने संवाद साधला. विद्यार्थ्यांनी सुद्धा शिक्षणमंत्री यांना विविध विषयांवर प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांच्या निरागस प्रश्नाना मनमुराद उत्तरे शिक्षण मंत्र्यांनी दिले.शिक्षणमंत्री यांच्या भेटीमुळे शाळेतील



शिक्षक व विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळाली असून, गुणवत्तापूर्ण, आनंददायी आणि अनुभवाधारित शिक्षणाच्या दिशेने आणखी प्रभावीपणे कार्य करण्याची नवी ऊर्जा मिळाली आहे.

याप्रसंगी शिवसेना जिल्हा प्रमुख विनोद सांतंगे, युवा सेना रामटेक लोकसभा अध्यक्ष राज तांडेकर, माजी जि.प.सदस्य प्रकाश खापरे, माजी उपसभापती राहुल तिवारी, शिवसेना तालुका प्रमुख बिरजू रघुवंशी, विश्वजित सिंह, भूषण हरडे, विभागीय शिक्षण संचालक शिवलिंग पटवे, विभागीय सहसंचालक दिपेंद्र लोखंडे, शिक्षणाधिकारी अनिल दहिफळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश गुंड, गटविकास अधिकारी मनोज हिरुळकर, गटशिक्षणाधिकारी अभिजित कावरे, विशाल गौर, कश्यप सावरकर, पुरुषोत्तम मुंडे, निलेश सपाटे, मुख्याध्यापक अनिल भेदे, जयश्री शिंदे आदी उपस्थित होते.

# खापरखेड्यात शिक्षण मंत्री भुसे यांना एनएसयुआयचे गिहे यांचा संतप्त सवाल



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांच्या खापरखेड्यातील जिल्हा परिषद शाळा, चणकापूर येथील भेटी दरम्यान एक महत्त्वाची घटना घडली.

राज्यातील बंद पडत चाललेल्या सरकारी शाळा, त्यांची अत्यंत दयनीय झालेली दैनंदिन अवस्था आणि राज्यामध्ये सातत्याने होणाऱ्या परीक्षा फुटीच्या (पेपर लीक) घटनांबाबत एनएसयुआय (NSUI) महाराष्ट्र प्रदेश सचिव साहिल क्रिष्णा गिहे यांनी शिक्षण मंत्र्यांना थेट जाब विचारला. विद्यार्थ्यांच्या मूलभूत आणि ज्वलंत प्रश्नांवर मंत्र्यांना घेरून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर रोखठोक भाष्य करण्यात आले. चणकापूर येथील जि.प. शाळेला भेट देण्यासाठी आलेल्या शिक्षण मंत्र्यांसमोर ग्रामीण भागातील शाळांची बिकट वास्तव्यता आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या परीक्षाफुटीच्या प्रकारांवर शासनाचे मौन क्यों, असा सज्जड सवाल साहिल गिहे यांनी केला.

शिक्षण क्षेत्रातील या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याबद्दल एनएसयुआयच्या वतीने शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे व महाराष्ट्र सरकारचा जाहीर निषेध तीव्र शब्दांत नोंदवण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी, दर्जेदार शिक्षणासाठी आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रियेसाठी हा लढा असाच सुरू राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला असून, शासनाने शिक्षण क्षेत्रातील ढासळत्या स्थितीकडे तात्काळ लक्ष न दिल्यास याहून तीव्र आंदोलने करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## थोडक्यात बातम्या

# शिव पाणंद चळवळीच्या लढ्याला यश

### प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण हटवले; शेतकऱ्यांकडून स्वखर्चाने तातडीने मुरूम टाकण्यास सुरुवात



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळ आणि शेतकऱ्यांच्या अविरत पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. निफाड तालुक्यातील मौजे आहेरगाव ते पाचोरेवणी दरम्यान गेल्या १५ वर्षांपासून बंद असलेला शिव रस्ता प्रशासनाच्या सहकार्याने यशस्वीरित्या खुला करण्यात आला आहे. रस्ता मोकळा झाल्याने दोन्ही गावांतील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.सुमारे २ ते अडीच किलोमीटर लांबीच्या या शिव रस्त्याची मोजणी व सीमांकन प्रक्रिया आधीच पूर्ण झाली होती. मात्र, काही कारणास्तव रस्त्याचा वापर बंद होता. अखेर मा. उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड यांच्या प्रशासकीय आदेशानुसार ७ व ८ सप्टेंबर रोजी रस्त्यावरील अतिक्रमणे हटवण्याची मोहीम राबवण्यात आली. प्रशासनाचे चोख सहकार्यशिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली.

या कारवाईत पालखेड व ओझरचे मंडळ अधिकारी बच्छाव, विधाते, भूमापक घुगे, राहुल अहिरे, दत्ता मोटे, गोरख डोकळे, शीतल पाटील, ग्राम महसूल अधिकारी जहागीरदार मॅडम यांच्यासह पोलीस प्रशासनाचे गुरव, पोलीस हवालदार अनिल जाधव, पोलीस कॉन्स्टेबल संदीप शेवाळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शेतकऱ्यांनी दाखवला मोठेपणाकाही ठिकाणी 'झिरो शिव' असतानाही शेतकऱ्यांनी सार्वजनिक हितासाठी स्वतः ची जमीन रस्त्यासाठी दिली. रस्ता खुला होताच लाभधारक शेतकऱ्यांनी विलंब न लावता स्वखर्चाने दगड-मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले असून, हा मार्ग लवकरच पूर्ण क्षमतेने वाहतूकयोग्य होणार आहे. या मोहिमेसाठी शिव पाणंद चळवळीचे सदस्य विजय दरेकर, सुरेश वाटपाडे, शिवराम नाना रसाळ, नवनाथ सालगुडे, साठे, भगवान रसाळ, दोन्ही गावांचे तंटामुक्ती अध्यक्ष, पदाधिकारी व शेतकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व प्रशासकीय अधिकारी व शेतकऱ्यांचे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळ व तालुका कृती समितीतर्फे आभार मानण्यात आले.

# शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल दहेगाव येथे सदिच्छा भेट



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील सेंट ॲन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे माननीय शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या आगमनाने संपूर्ण विद्यालय परिसरात उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यालयाच्या प्राचार्या सिस्टर क्लिओफस व विद्यालय व्यवस्थापनाच्या वतीने मंत्री महोदयांचे पुष्पगुच्छ देऊन आत्मीय स्वागत करण्यात आले. विद्यालयाच्या बँड पथक तसेच ६३ महाराष्ट्र बटालियन NCC, नागपूरच्या कॅडेट्सनी अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात त्यांचे औपचारिक स्वागत केले. शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी NCC कॅडेट्स तसेच बँड पथकातील विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक करून पुष्पगुच्छ देत त्यांचे अभिनंदन व उत्साहवर्धन केले. यावेळी मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने संवाद साधत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी निष्ठेने व सातत्याने अभ्यास करावा, निश्चित केलेल्या ध्येयाप्रती पूर्ण एकाग्रता ठेवावी तसेच स्वतःची आवड, क्षमता व अभिरुची लक्षात घेऊन भविष्यात योग्य करिअरची निवड करावी, असा मौलिक संदेश त्यांनी दिला.

याप्रसंगी NCC कॅडेट कु.वेदिका खुशाल इंगोले हिच्या हस्ते शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना छत्रपती शिवाजी महाराज व महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांवर आधारित पुस्तक "Token of Love' म्हणून सप्रेम भेट देण्यात आले. ही भेट विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंदाच्या वतीने आदर, सन्मान व कृतज्ञतेचे प्रतीक ठरली. मंत्री महोदयांनी विद्यालय व्यवस्थापन व शिक्षकवृंद शिक्षण क्षेत्रात करीत असलेल्या समर्पित व उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले. विद्यालयातील उत्कृष्ट पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सोयी-सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या सकारात्मक शैक्षणिक वातावरणाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन व आयोजनासाठी दीपेंद्र लोखंडे, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग; हर्षलता बुराडे, प्राचार्या, DIET, नागपूर; अनिल दहिफळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक); निलेश गुंड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक); अभिजीत कावरे, गटशिक्षणाधिकारी; पुरुषोत्तम मुंडे, विशेष अधिकारी; तसेच श्रीमती मंगला लांडे, क्लस्टर प्रमुख यांचे बहुमोल मार्गदर्शन, सहकार्य व प्रोत्साहन लाभले. त्यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल विद्यालय व्यवस्थापनाच्या वतीने मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी विद्यालयास दिलेला बहुमोल वेळ, विद्यार्थ्यांशी साधलेला प्रेरणादायी संवाद, तसेच त्यांचे उत्साहवर्धक मार्गदर्शन हे संपूर्ण विद्यालय परिवारासाठी गौरवपूर्ण, प्रेरणादायी व अविस्मरणीय अनुभव ठरले.

# जिल्हा परिषद शिक्षकपदी निवड झालेल्या तीन शिक्षकांचा चारठाण्यात सत्कार

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०९, चारठाणा (परभणी) :** जिल्हा परिषद शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल चारठाणा येथील अनिरुद्ध भैय्या चव्हाण, पिंपरी (गो.) येथील संतोष अच्युतराव गोंडगे आणि चारठाणा येथील स्वप्नील चंद्रकांत फटके यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. चारठाणा येथील दशरथ आबा चव्हाण यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात तीनही नवनियुक्त शिक्षकांचा हार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी तिन्ही शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा परिषद सदस्य शंकरभाऊ जाधव, सलीमभाई काझी, मा.प.स. मधुकर भवाळे, हनुमंत चव्हाण, जलीलभाई इनामदार, जीवन भवरे, नानासाहेब निकाळजे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. तीनही शिक्षकांची जिल्हा परिषद शिक्षकपदी झालेली निवड ही चारठाणा व परिसरासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.